# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. २०/०५/२०१७

## केरळमध्ये आरडीएफ सदस्य अजयकुमार व इतर यांना एरणाकुलम विशेष न्यायालयाने सुनावली शिक्षा

जिल्हा व सत्र न्यायालय, गडचिरोली येथील सत्र खटला क्रमांक १०/२०१४ व १३०/२०१५ सरकार विरुध्द महेश तिरकी व इतर या खटल्याचा निकाल दि. ७ मार्च २०१० रोजी झाला असून त्यामध्ये आरोपी जी.एन.साईबाबा, प्रोफेसर दिल्ली विद्यापीठ व इतर आरोपींना जन्मठेपेची शिक्षा ठोठाविण्यात आली आहे. सदरहू खटल्यामध्ये आरोपी जि.एन.साईबाबा यांचे दिल्ली येथील निवासस्थानातून जप्त केलेले पेन ड्राईव्ह, हार्ड डिस्क, मेमरी कार्ड व इतर इलेक्ट्रानीक पुराव्याच्या आधारे त्यांना शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

सदरहू खटल्यामध्ये आरोपी जि.एन.साईबाबा यांचे दिल्ली येथील निवासस्थानातून जप्त केलेले पेन ड्राईव्ह, हार्ड डिस्क, मेमरी कार्ड व इतर इलेक्ट्रानीक च्या कॉपी मिळण्याबाबत केरळ येथील नॅशनल इनव्हेस्टीगेशन एजन्सी च्या अधिकाऱ्यांनी गडचिरोली न्यायालयात अर्ज दाखल केला होता. तो अर्ज न्यायालयाने मंजुर करून गडचिरोली येथील न्यायालयात जप्त असलेले हार्ड डिस्कच्या कॉपी त्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

खटला क्रमांक आरसी ४/२०१३/एनआयए मध्ये नॅशनल इनव्हेस्टीगेशन एजन्सी च्या तपासामध्ये २०१२ साली अजयकुमार व ईतर यांच्याविरूध्द कलम ३६३, १२० बी, १२४ ए भा.द.वी. तसेच कलम १०, १३, ३८, ३९ युएपीए कायद्या अंतर्गत दोषारोप पत्र दाखल करण्यात आले होते. त्या खटल्यामध्ये गडचिरोली सत्र न्यायालयात नक्षल आरोपी जि.एन.साईबाबा यांच्याविरूध्द चालविण्यात आलेल्या खटल्यामधील हार्ड डिस्क एन.आय.ए. केरळ यांना पुरविण्यात आल्या होत्या, सदरहू पुरविण्यात आलेल्या पेन ड्राइव्ह, हार्ड डिस्क, मेमरी कार्ड मधील व्हिडीओ क्लीप मध्ये दि. २२ व २३ एप्रील रोजी हैद्राबाद येथे झालेल्या सभेमध्ये अजयकुमार व साईबाबा हजर असल्याचे दिसून येते. तसेच सदरहु अजयकुमार हा आर.डी.एफ. (रेग्युलेशनरी डेमोक्रॅटीक फ्रंट) संघटनेचा सदस्य असल्याचे सिध्द झाले आहे. आणि गडचिरोली येथील सरकार विरुध्द महेश तिरकी व इतर ज्यामध्ये जी.एन.साईबाबा आरोपी होता. या खटल्याचे तपासी अधिकारी तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी, अहेरी श्री. सुहास बावचे यांची साक्ष ग्राहय धरून केरळमधील येरणाकुलम विशेष न्यायालयाने जिल्हा व सत्र न्यायालय गडचिरोली यांनी सरकार विरुध्द महेश तिरकी व इतर या खटल्यामध्ये दिलेल्या निकालाच्या आधारे अजयकुमार व ईतर यांना दिनांक २९/०४/२०१७ च्या न्यायनिवाडयाप्रमाणे ३ वर्षाच्या सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे.